सकाळ

# वाघ संस्थेतर्फे आज आरोग्य तपासणी



**नाशिक :** कर्मवीर काकासाहेब वाघ शिक्षण संस्था, के. के. वाघ फाउंडेशन, श्री बाळासाहेब वाघ वेल्फेअर फाउंडेशन आणि स्माईल व स्पिनॅच यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (ता. ६) कै. बाळासाहेब देवराम वाघ यांच्या स्मृतीप्रित्यर्थ चांदोरी, खेरवाडी, गोंडेगाव परिसरातील नागरिकांसाठी चांदोरी येथील के. के. वाघ शैक्षणिक संकुलात मोफत महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. श्री. साईबाबा हार्ट इन्स्टिट्यूट अ‍ॅन्ड मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, नामको हॉस्पिटल व मणिशंकर आय हॉस्पिटलच्या तज्ज्ञ डॉक्टर्सच्या उपस्थितीत आरोग्य तपासणी व मार्गदर्शन मिळणार आहे. शिबिरप्रसंगी हृदयरोगतज्ज्ञ डॉ. अनिरुद्ध धर्माधिकारी यांचे 'बदलती जीवनशैली आणि हृदयरोग' विषयावर सकाळी साडेनऊला व्याख्यान होणार आहे.

Nashik, Nashik-Today
06/04/2025 Page No. 2